जिल्हा परिषद, पुणे
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
स्वच्छ भारत मिशन (ग्रा)
नविन जिल्हा परिषद इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता, - पुणे ०१

# अभिव्यक्ती स्वारस्य (EOI) फॉर्म

कामाचे नाव :- स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत गावस्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प करीता सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रके व प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, सादरीकरण करणे, तांत्रिक मान्यता, प्रशासकिय मान्यता घेणे व कार्यारंभ आदेश निर्गमीत करणे तसेच तांत्रिक सल्ला व सहाय्य व प्रकल्प पर्यवेक्षण प्रदान करणे.

तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार व पत्ता : ____________________

____________________

____________________

Scanned with OKEN Scanner

# अभिव्यक्ती स्वारस्य सुचना
## (EXPRESSION OF INTEREST)

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हा परिषद पुणे अंतर्गत जिल्हयातील गावांमध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे अनुषंगाने गावांचे सर्वेक्षण करणे, सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करणे, अंदाजपत्रके तयार करणे, सादरीकरण करणे, तांत्रिक मान्यता घेणे, प्रशासकीय मान्यता घेणे व कार्यारंभ आदेश निर्गमित करणे तसेच प्रकल्पाचे अनुषंगाने तांत्रिक सल्ला व साहाय्य करणे व प्रकल्प पर्यवेक्षण इत्यादि बाबीसाठी दर निश्चित करुन दर करार करणेसाठी इच्छुक सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराचे Panel (समुह) तयार करण्यासाठी इच्छुक सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदारांनी सोबतच्या प्रपत्र "अ" नुसार आवश्यक माहिती, कागदपत्रे mahatenders.gov.in व्दारे तसेच nbazppune@gmail.com या मेल आयडी वर किंवा स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हा परिषद, पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष सादर करावीत.

### निविदा अटी व शर्ती

१. याबाबत निविदा प्रक्रीया ई-निविदाव्दारे, ई-मेल आयडी, व प्रत्यक्ष कार्यालयात सादर करता येईल.
२. निविदा संबंधी यापुढे सर्व सुचना / शुध्दीपत्रके ई. **httpp://mahatenders.gov.in** व www.punezp.mkcl.org या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.
३. उपरोक्त कामासंबंधी आवश्यक माहिती httpp://mahatenders.gov.in व www.punezp.mkcl.org या संकेतस्थळावर पाहता व डाऊनलोड करता येतील. तसेच ईच्छुक सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार हे दिनांक ०३/०९/२०२२ सकाळ १०.०० वा. पासून दिनांक २१.०९.२०२२ सांय. १७.०० वा. या कालावधीत माहिती httpp://mahatenders.gov.in व nbazppune@gmail.com या मेल आयडी वर किंवा स्वच्छ भारत मिशन (ग्रा) जिल्हा परिषद, पुणे या कार्यालयास प्रत्यक्ष सादर करु शकतील.
४. सदरचे कामाची प्राप्त निविदा दि. २२.०९.२०२२ रोजी सांय. १७.०० वा. नंतर उघडले जातील.
५. कोणतीही प्राप्त निविदा (ऑनलाईन, ऑफलाईन) स्विकारणे अथवा नाकारणेचा अंतिम निर्णय या कार्यालयाचा राहील.
६. निविदा फी र. रु. १००००/- httpp://mahatenders.gov.in निविदा भरणारेस ऑनलाईन getway पध्दतीने व nbazppune@gmail.com या मेल आयडी वर किंवा प्रत्यक्ष कार्यालयात प्रस्ताव सादर करतांना DD (धनाकर्ष (मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे यानावाने जमा करणे.आवश्यक)
७. बयाणा र. रु. १,००,०००/- httpp://mahatenders.gov.in निविदा भरणारेस ऑनलाईन getway पध्दतीने व nbazppune@gmail.com या मेल आयडी वर किंवा प्रत्यक्ष कार्यालयात प्रस्ताव सादर करतांना DD (धनाकर्ष (मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे यानावाने जमा करणे.आवश्यक)

### कामासंबंधी अटी शर्ती

१. उपरोक्त कामाचे सुचनेच्या अटी व शर्ती मध्ये बदल करणे व दरपत्रक कोणतेही कारण न देता प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
२. प्रपत्र अ नुसार पात्र ठरलेल्या सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचीच पुढील कार्यवाही करण्यात येईल.
३. प्रपत्र अ मधील अटी पुर्ण करणा-या व पात्र ठरणा-या सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची निवड करण्यात येईल.



Scanned with OKEN Scanner

४. तांत्रिक बाबीमध्ये अपात्र ठरलेल्या सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचेसोबत कसलाही पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
५. जी. एस. टी. बाबत वेळोवेळी निर्गमीत होणारे शासन निर्णय, शासन परिपत्रके, शासन अध्यादेश शासन पत्रे बंधनकारक राहील.
६. सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराने विहित नमुन्यातील प्रस्ताव आवेदनपत्र सादर करतांना कागदपत्रे सादर करण्या पुर्वी स्वतः कागदपत्रावर पृष्ठ क्रमांक नमूद करून पृष्ठांकीत करुन सादर करावीत.
७. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन संबंधी जिल्हयातील गावांचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके व आराखडे कार्यारंभ आदेश दिल्यापासून टप्याटप्प्याने 1 महिन्याचे आत सादर करणे बंधनकारक राहील.
८. निविदा स्पर्धेतून माघार घेतल्यास दंडात्मक कार्यवाही :- तांत्रिक लिफाफ्याच्या पडताळणी अंती पात्र कंत्राटदारानी माझा तांत्रीक लिफाफा उघण्यात येऊ नये अथवा मी स्पर्धेतून माघार घेत आहे. असे पत्र दिल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येऊन संबंधित ठेकेदारावर निविदा मुल्यांकन समिती दंडात्मक कार्यवाही करु शकते.

**अ) तांत्रिक कामाचा अनुभव / पात्रता अटी व शर्ती :**

१. जिल्हा परिषद /महानगरपालिका /नगरपरिषदेमध्ये यापूर्वी किमान एका गाव / शहरासाठी स्वच्छ भारत मिशन (ग्रा) योजनेंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन संबंधी सर्वेक्षण करुन संकल्पन अंदाजपत्रके व आराखडे तयार केले असल्याबाबत सक्षम अधिका-यांचे अनुभव प्रमाणपत्र (Not below the rank of Dy. Chief Executive Officer, Executive Engineer / Chief Officer of Municipal Council / Commissioner of Municipal Corporation)
२. सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचेकडे अनुभवी स्थापत्य अभियंत्यासह उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळाची यादी निविदे सोबत जोडणे आवश्यक आहे.
३. सदर कामासाठी संबंधित व्यक्ती /संस्था ही धर्मादाय / कामगार आयुक्तालय / मजीप्रा / जि.प. / सा.बां / जलसंपदा / सिडको/ एमआयडीसी / व तत्सम शासकीय यंत्रणेकडे नोंदणीकृत असावा.
४. सदर कामासाठी संबंधित व्यक्ती/संस्था यांच्याकडे उपलब्ध सर्वेक्षण संसाधनांची यादी (जसे सर्वेक्षण साहित्य, वाहन इ. मालकी हक्क पुराव्यासहित), उपलब्ध तांत्रिक मनुष्य बळाची यादी, प्रसिध्द केलेल्या खालील अटी व शर्ती मान्य असल्या बाबतचे प्रमाणपत्र, पॅन कार्ड, सन २०२१-२०२२ अखेर पर्यंतचे आयकर भरल्याचे विवरणपत्र, वस्तु व सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
५. प्रपत्र अ नुसार

**ब) कामाची व्याप्ती (Scope of work) :**

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन विभागाच्या मार्फत स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत पुणे जिल्ह्यातील जिल्हा परिषदेमार्फत अंमलबजावणी करावयाच्या वार्षिक कृती आराखडा सन 2021-22 व सन 2022-23 मधील दि. ०२.१२.२०२१ रोजीचे व इतर शासन निर्णय नुसार घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अनुषंगांने सर्वेक्षण करणे, संकल्पन, नकाशे करणे, अंदाजपत्रके व सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणे, सादरीकरण करणे व तांत्रिक, प्रशासकिय मान्यता प्राप्त करुन घेणे, डी.टी.पी, बी.ओ.क्यु. तयार करणे, ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करुन कार्यारंभ आदेश निर्गमीत करणे तसेच प्रकल्पाचे पर्यवेक्षण करणे कामी तांत्रिक सल्ला व सहाय्य सेवा देणे इ.



Scanned with OKEN Scanner

**ख) देयकाची अदायगी व कामाचे वाटप :**

१. सदर कामासाठी योजनेच्या दि. ०२.१२.२०२१ रोजीचे व इतर शासन निर्णय नुसार अंदाजपत्रकिय किंमतीच्या (प्रशासकीय मान्यता रकमेच्या) अनुज्ञेय असलेल्या रक्कमेचे ५ % किंवा र. रु. १.०० लक्ष (रु. एक लक्ष) यापैकी जे कमी असेल त्या दराने सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचा मोबदला जिल्हा स्तरावरुन अदा करण्यात येईल.

२. सदरचा खर्च स्वच्छ भारत मिशन (ग्रा) सन २०२१-२०२२ व सन 2022-23 अंतर्गत उपलब्ध निधीतून रक्कम उपलब्धतेनुसार होत जाईल व त्यानुसार कामाबाबत देयक अदायगी करण्यात येईल. अंदाजपत्रकास शासन स्तरावरील अथवा तांत्रिक छाननी समितीची मंजुरी व प्रशासकिय मान्यता मिळाल्यानंतर कार्यारंभ आदेश निर्गमीत केल्यानंतर सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदारचा मोबदला निधी उपलब्धते नुसार अदा करण्यात येईल.

३. काम कोणत्याही टप्प्यावर/पुर्णतः रद्द करण्याचे अथवा केवळ कामाच्या अंशिक भागासाठी कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पुणे यांनी राखून ठेवले आहेत.

४. कार्यारंभ आदेश प्राप्त करण्यापुर्वी वाटप करण्यात आलेल्या एकुण कामाच्या मंजूर दरानुसार देय रक्कमेच्या 2 टक्के एवढी सुरक्षा अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डीडी) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे या नावाने जमा करावी लागेल.

५. सदर कामासाठी मंजूर दरानुसार पूर्ण जिल्हयामध्ये काम करण्यास तयार असलेल्या पात्र सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचे पॅनल तयार करण्यात येईल. त्यानुसार कामाची विभागणी करुन कामाचे मंजूर दराने तालुकानिहाय आदेश देण्यात येतील. त्या करीता संबंधित सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांनी कार्यारंभ आदेशाच्या प्रमाणात मुद्रांकावर (स्टॅंप पेपर) करारनामा करुन द्यावा लागेल.

६. पॅनेल तयार करण्याचे व काम विभागून देण्याचे सर्व अधिकार समितीस असतील.

**ड) अंदाजपत्रक तयार करतांना खालील बाबींचे अनुपालन आवश्यक राहिल :**

१. सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदारास आराखडयात प्रस्तावित कामे किमान खर्चाच्या निकषात तसेच Cost / Capita च्या निकषात बसवण्याचा प्रयत्न करावा लागेल अन्यथा वाढीचे स्वयंस्पष्ट तांत्रिक समर्थन संबधित उपअभियंता यांचेमार्फत सादर करावे लागेल.

२. भुस्तर / Strata Classification साठीचे Trial Pits घेणे अनिवार्य राहिल.

३. तांत्रिक छाननी समितीच्या सादरीकरणातील उपस्थित मुद्यांचे समर्थनिय निराकारण करणे, तांत्रिक व प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेशापर्यंतची प्रक्रिया होई पर्यंतच्या त्रुटीची पुर्तता करण्याची जबाबदारी तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची राहिल. तसेच, शासन पाणी पुरवठा विभागाकडील प्राप्त पत्र तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय / परिपत्रक / पत्रानुसार पूर्तता करणे बंधनकारक राहील.

५. प्रस्तावित प्रकल्पासाठी जागा सरकारी असल्यास 7/12 / ग्रामपंचायत नमुना 8अ व खाजगी जागा असेल तर संमतीपत्र किंवा नोंदणीकृत दानपत्र/ बक्षीसपत्र असणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावे.

६. प्रस्तावित व अस्तित्वातील उपांगे दर्शविणारे Google Map

अ. प्रस्तावित कामे लाल रंगाने दर्शविणे.

आ. अस्तित्वातील कामे हिरव्या रंगाने दर्शविणे.

७. सर्वेक्षणाच्या वेळेस संबंधित शाखा अभियंता / उप अभियंता यांना सोबत घेऊन अभिलेख्यावरील/ अंदाजपत्रकावर / आराखड्यावर त्यांच्या तपासणी केलेबाबत (Checked by me) म्हणुन स्वाक्ष-या घेणेची जबाबदारी सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची राहील.



Scanned with OKEN Scanner

८. अंदाजपत्रके व आराखडे सादर करतांना त्यात खालील Drawing चा समावेश असावा व अंदाजपत्रक हे शासन स्तरावरील अथवा तांत्रिक छाननी समितीने अंतिम मान्यता दिल्यानंतर आवश्यक दुरुस्ती करुन अंदाजपत्रकाच्या अंतिम ३ प्रती सादर करण्याची जबाबदारी संबंधित तांत्रिक सल्लागाराची राहिल.

९. सर्वेक्षणासाठी Total Station / DGPS / Auto level इ. उपकरणांचीची उपलब्धता असल्याचे निविदाधारकाने प्रमाणित करुन त्याव्दारे सर्वेक्षण करणे अनिवार्य राहिल.

१०. विद्युत जोडणी :- विद्युत जोडणीसाठी उद्भवाचे स्थळ ते अस्तित्वातील विद्युत पुरवठयाचे ठिकाण (Electric line) या मधील अंतराचा अंदाज घेऊन विद्युत जोडणीसाठी अंदाजपत्रकात पुरेशी तरतूद ठेवावी. या करिता संबन्धित MSEDCL कडून कोटेशन प्राप्त करून घेण्याचे जबाबदारी संबंधीत संस्था / कंत्राटदार यांची राहील. उद्भव जागेच्या उपलब्धतेनुसार अंदाजपत्रकात सोलर सिस्टिमची (Off grid / On grid) तरतूद ठेवण्यात यावी.

११. सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराकडे उपलब्ध असलेल्या खाजगी भूवैज्ञानिक कडून झालेल्या सर्वेक्षणाचा दाखला जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचेकडून प्रती स्वाक्षरी करुन घेण्याची जबाबदारी संबंधीत तांत्रिक सल्लागाराची राहील. खालील नकाशे तीन प्रतीमध्ये सादर करणे अनिवार्य राहिल. A. Google Map] B. Key Plan / Quarry chart (if applicable) C. L Section of Rising Main with T.P. results at 200 m D. Flow Diagram E. Excavation profile F. Any other drawing as per scheme requirment

१२. सर्वेक्षणाचे सर्व फिल्ड बुक व अंदाजपत्रकाची / संकल्प चित्राची (Design / Drawing) Soft Copy उपविभागीय कार्यालयात जमा करणे अनिवार्य असेल व ती जिल्हा परिषदेची मालमत्ता असेल.

१३. बांधकाम साहित्य वहन अंतर प्रमाणपत्र (Lead Certificate) अनिवार्य असेल.

१४. विद्युत पुरवठा उपलब्धतेनुसार Pumping Hours 12 तास घ्यावे

१५. योजनेचे संकल्पन भविष्यातील 30 वर्षात वाढणारी लोकसंख्या गृहीत धरून काढावे.

१६. तांत्रिक मान्यतेची जबाबदारी संबंधित सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांची उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा जि. प. पुणे यांचेकडून घेण्याची जबाबदारी राहिल.

१७. योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करताना स्वच्छ भारत मिशन (ग्रा) मार्गदर्शक सुचना व शासननिर्णय परिपत्रकानुसार ग्रामपंचायतकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करुन घेण्याची जबाबदारी संबंधित संस्थेची / पॅनलची राहिल.

१८. योजनेतून स्वच्छ भारत मिशन (ग्रा) च्या निर्देशानुसार प्रत्येक महसुली गावातील कुटुंब स्तरावर तसेच सार्वजनिक स्तरावर स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने योजनेची संकल्पन, आराखडे (Design/plan) करणे आवश्यक राहिल.

१९. DPR ला तांत्रिक मान्यता मिळाल्यानंतर त्यांचे ०३ सेट सादर करणे बंधनकारक राहिल.

२०. संबंधित सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांना सर्वेक्षण व अंदाजपत्रक आराखडे तयार करण्यात येणाऱ्या कामाचे कार्यारंभ आदेश या कार्यालयाकडून प्राप्त झाले नंतर काम हाती घेण्याची कार्यवाही करावी.

२१. सर्वेक्षणाच्या कामामध्ये प्रत्यक्ष जागेवर जाऊन गावातील संबंधित जागेचे सर्वेक्षण करणे आवश्यक आहे. नकाशे व आराखडे तयार करणे, बाबनिहाय संकल्पन तयार करणे, जागेचा तपशिल दर्शवणारी किमान 3 छायाचित्रे घेणे, Field Book (Soft and Hard) सादर करणे, Auto Cad वर नकाशे तयार करुन त्याचे सह कलरप्रिंट आऊट 3 प्रतीत तयार करणे या बाबीचा समावेश असेल. तसेच Population forecasting, आवश्यक सर्व उपांगाचे CPHEEO मॅन्युअल व स्वच्छ भारत मिशन (ग्रा) प्रचलित मार्गदर्शक सूचनांनुसार



Scanned with OKEN Scanner

संकल्पन तयार करुन 3 प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. सदर सर्वेक्षणामध्ये वाहतुक, पाईपलाईन खोदाईचा स्तर (Trial Pits) निश्चित करण्याची जबाबदारीसुध्दा संबंधित संस्था/व्यक्ती पॅनेलची राहिल.

२२. सर्वेक्षणासाठी मागणी प्राप्त झाल्यानंतर मागणीनुसार सर्वेक्षण करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम संबंधित उपविभागीय अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग ठरवतील. तसेच उप विभागीय अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग यांनी दिलेल्या सुचना व आदेश पाळणे संबंधित सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदारास बंधनकारक राहिल. या कार्यालयाने ठरवून दिलेल्या प्राधान्यक्रमानुसार काम हाती घेणे बंधनकारक राहिल.

२३. योजनेचे सर्वेक्षणाचे आदेश मिळालेपासून (15) दिवसाच्या आत सर्वेक्षण करुन नकाशे, आराखडे व संकल्पन उपविभागात सादर करणे बंधनकारक राहिल.

२४. विहित मुदतीत कार्यवाही न झाल्यास प्रत्येक दिवसासाठी रु. 200/- या प्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. मुदत संपल्यानंतर 10 दिवसांत कार्यवाही पूर्ण न केल्यास अनामत रक्कम जप्त करुन संबंधित सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराचे नाव पॅनलमधुन कमी करण्यात येईल आणि / अथवा काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल.

२५. सर्वेक्षणासाठी आवश्यक असणा-या यंत्रसामग्री व उपकरणे इत्यादी प्रत्यक्ष साइटवर स्वखर्चाने नेण्याची / परत आणण्याची जबाबदारी सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची राहिल.

२६. सर्वेक्षणासाठी लागणारा सर्व डाटा सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराने ग्राम पंचायत व ग्राम पाणी पुरवठा समिती व ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागाकडुन स्वत: उपलब्ध करून घ्यावयाचा आहे.

२७. सर्वेक्षण करीत असताना स्वतंत्र लेवल नोंदवही ठेवणे त्यामध्ये आवश्यक त्या नोंदी घेणे व त्यानुसार Field Book तयार करुन सादर करणे सेवाभावी संस्था/तांत्रिक सल्लागार संस्था/कंत्राटदारवर बंधनकारक राहिल.

२८. सर्वेक्षण करीत असताना घेतलेल्या लेव्हल्स तपासणी (Cross Verifications) संबंधित उप अभियंता करतील त्यात त्रुटी आढळल्यास पुन्हा सर्वेक्षण करावे लागेल व त्यासाठी येणारा जादा खर्च व्यक्ती /संस्था यांना मिळणार नाही.

२९. नियमाधिन करांची वसुली देयकातुन करण्यात येईल.

३०. योजना राबविताना येणा-या कायदेशीर अडचणी अथवा वाद उदभवल्यास त्यावर अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. पुणे यांचा राहिल. व त्यांचा अंतिम निर्णय संबंधितांवर बंधनकारक राहिल.

३१. सदर सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदारास कोणतेही पूर्वसूचना न देता कोणत्याही क्षणी बरखास्त करण्याचा अधिकार उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व), जि.प. पुणे यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. पुणे यांचे मान्यतेने राहतील.

३२. शासन निर्णय मध्ये नमूद मंजूर दरानुसारच होणा-या कामाच्या देयकाची अदायगी करण्यात येईल.

३३. पाटबंधारे / रेल्वे खात्याच्या GTS Bench Mark वरून Fly levels carry करून त्यानुसार योजनेचे सविस्तर सर्वेक्षण करणे बंधनकारक राहिल.

| | | |
|---|---|---|
| **कार्यकारी अभियंता (ग्रापापु)** | **उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पा व स्व)** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| **जिल्हा परिष, पुणे** | **जिल्हा परिषद, पुणे** | **जिल्हा परिषद पुणे** |

Scanned with OKEN Scanner

# जिल्हा परिषद, पुणे
## जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष
## स्वच्छ भारत मिशन (ग्रा)
नविन जिल्हा परिषद इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रस्ता, - पुणे ०१

पुणे जिल्हा परिषद, पुणे

**प्रपत्र - "अ"**

**निवडीच्या गुणतक्त्याचे निकष** : अर्जदार तांत्रिक सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार खालील निकष पुर्ण करीत असली पाहीजे व तांत्रिक संस्था प्रमुखाने प्रस्तावा सोबत खालील कागदपत्राच्या प्रमाणीत (स्वाक्षरी व शिक्का) व डिजीटल सिग्नेचर अनिवार्य आहे.

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १. | अर्जदार तांत्रिक सल्लागार संस्था / सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांची नोंदणी किमान 03 वर्षापुर्वीची असावी व नोंदणी पत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. | १० |
| २. | अर्जदार सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचे मागील 03 वर्षाचे ताळेबंद ( सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२) एकत्रित उलाढाल किमान र. रु. ५०.०० लक्ष(र. रु. पन्नास लक्ष) केवळ असावी तसे प्रमाणीत लेखापरिक्षक यांचे प्रमाणपत्र सोबत जोडणे आवश्यक आहे. | १० |
| ३. | सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराचे पॅन कार्ड | १० |
| ४. | सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराचे टॅन कार्ड GST प्रमाणपत्र | १० |
| ५. | मागील तिन वर्ष DPR तयार करणे कामाचा अनुभव<br>१) १० ऑर्डर पर्यत ०३ गुण<br>२) २० ऑर्डर पर्यत ०५ गुण<br>३) ३० ऑर्डर पर्यत १० गुण | १० |
| ६. | मागील 03 वर्षाचे आर्थिक उलाढालीचे लेखापरिक्षक यांचे प्रमाणपत्र<br>( सन २०१९-२०, २०२०-२१ व २०२१-२२) | १० |
| ७. | घनकचरा व सांडपाणी प्रकल्प संबधी सर्वेक्षण, संकल्पन, अंदाजपत्रक, सविस्तर प्रकल्प अहवाल पर्यवेक्षण इत्यादी कामाच्या अनुभवा बाबतचा किमान चार पानामध्ये सविस्तर अहवाल. (त्यात कामाचे ठिकाण, प्रकल्पाचे नाव, कालावधी, प्रकल्पाची किंमत, या कामी उपलब्ध केलेले मनुष्यबळ वापरण्यात आलेली कार्यपध्दती व प्रकल्पाचे मुख्य व्यक्तीचा बायोडाटा इत्यादी बाबीचा समावेश असावा.) | १० |
| ८. | सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदार यांचे संकल्पनाचे तंत्रज्ञान हे शासनाने नमुद केलेल्या स्वच्द भारत मिशन (ग्रा) अंतर्गत घनकचरा व सांडपाणी योजना विषयीच्या शासन निर्णय, परिपत्रक, I.S. Code व C.P.H.E.E.O. यांचे मार्गदर्शक तत्वानुसार असणे बंधनकारक आहे. | १० |
| ९. | सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराकडील कर्मचारी यांची किमान शैक्षणीक पात्रता D.C.E. / B.E. Civil / B. Tech. असणे आवश्यक आहे. सदर अभियंता मागील 06 महिन्यापासून कार्यरत असल्याचे पुरावे जोडणी बंधनकारक आहे. | १० |
| १० | सेवाभावी संस्था / तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराकडे उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ व संसाधने | १० |

प्रपत्र अ मध्ये किमान 75 गुण घेतलेल्या तांत्रिक सल्लागार संस्था / कंत्राटदाराची निवड समिती मार्फत करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

## परिशिष्ट - १

(नमुना सत्यप्रतिज्ञापत्र (रु.५००/- च्या स्टॅम्प पेपरवर)

## सत्य प्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी --------- वय वर्षे ------------- राहणार ----------------- या सत्यप्रतिज्ञा पत्राव्दारे लिहून देतो की, मी ------- ------ ------------- या फर्म चा /कंपनीचा मालक असून ----- --------- ----------- --- या कामासाठी आवेदनपत्र सादर करीत आहे. त्या आवेदन पत्रासोबत जी कागदपत्रे सादर केली आहेत ती खरी , बरोबर व पूर्ण आहेत, त्यामध्ये कोणत्याही त्रुटी, चुका नाहीत, याची मी खात्री केलेली असून असे शपथपूर्वक खालील अटी व शर्थीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रांमध्ये काही चुकीची, दिशाभूल करणारी, खोटी व तसेच अपूर्ण महिती आढळल्यास मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

1. जर कंत्राट कालावधी दरम्यान मी, माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी ग्रामीण पाणी पुरवठाविभाग जिल्हा परिषद पुणे या कार्यालयास कोणतीही खोटी माहिती किंवा देयकासमवेत तसेच पत्रव्यवहारात खोटी / बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
2. जर कंत्राट कालावधी दरम्यान आणि काम समाप्ती नंतर , अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यंत सादरकेलेले कोणतेही कागदपत्रे खोटी / बनावट किंवा फसवी आढळल्यास , मी भारतीय दंडसंहिता अंतर्गतकायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.
3. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभूल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

**कंत्राटदाराची सही / शिक्का**



Scanned with OKEN Scanner